**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९९/२०१०/पुणे + ४००/२०१०/पुणे + ३०३३/२०१०/पुणे +३०३९/२०१०/पुणे + ३०४०/२०१०/पुणे + ३०४१/२०१०/पुणे +३०४२/२०१०/पुणे + ३०४३/२०१०/पुणे + ३०४४/२०१०/पुणे +३०४५/२०१०/पुणे + ३०४६/२०१०/पुणे + ३७२/२०११/पुणे +३७७/२०११/पुणे + ७९०/२०११/पुणे |

**सुधारीत आदेश**

**वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि.२१.०७.२०१०**

अपीलकर्ता श्री.प्रशांत जयवंत दोशी यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे केलेल्या उपरोक्त अपिलांवर आयोगाने दि.२१.०७.२०१० रोजी पारीत केलेल्या आदेशामध्ये खालीलप्रमाणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नावे समाविष्ट करण्यात येत आहेत :-

**अपील क्रमांक :- ३०३३/२०१०/पुणे + ३०३९/२०१०/पुणे + ३०४०/२०१०/पुणे + ३०४१/२०१०/पुणे + ३०४६/२०१०/पुणे + ३७२/२०११/पुणे + ३७४/२०११/पुणे + ३७७/२०११/पुणे + ७९०/२०११/पुणे**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
विभागीय कार्यालय क्र.१,
पुणे महानगरपालिका, पुणे

**उत्तरवादी**

२) **जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
घोले रोड क्षेत्रिय कार्यालय,
घोले रोड, पुणे

**अपील क्रमांक:- ३७३/२०११/पुणे + ३७६/२०११/पुणे प्रकरणी**

१) **अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

**उत्तरवादी**

**२) जन माहिती अधिकारी तथा** नगर भूमापन अधिकारी क्र.१,
नगर भूमापन अधिकारी क्र.१, पुणे यांचे कार्यालय,
पुणे

**अपील क्रमांक :- ३९९/२०१०/पुणे + ४००/२०१० + ३०४२/२०१०/पुणे + ३०४३/२०१०/पुणे + ३०४४/२०१०/पुणे + ३०४५/२०१०/पुणे**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
वॉर्ड क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे

**२) जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
वॉर्ड क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
घोले रोड क्षेत्रीय कार्यालय,
घोले रोड, पुणे महानगरपालिका, पुणे

उपरोक्त दुरुस्तीव्यतिरिक्त आयोगाचे दि.२१.०७.२०१० रोजीचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.

**स्थळ : पुणे**
**दि. २२.९.२०११**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती सत्यभामा नारायण कारंडे
एखतपूर, ता. सांगोला, जि. सोलापूर **अपिलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी,पंचायत समिती, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६८/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०२.२०११ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर श्री. जे. आर. आडसूळ<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग,सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर विद्यमान - श्री एफ. एल. उंबरजे, तत्कालीन - श्री. अनिल शि. धोंगडे | |
| ४ | **माहिती :-** मागणीच्या मुळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे**.** | |

## विवेचन

वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि :- ३०.०५.२०११

अपीलकर्त्या श्रीमती सत्यभामा नारायण कारंडे यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि. ३०.०५.२०११ आदेशामधील अ. क्र. २ येथे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. एफ. एल. उंबरजे व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,

सांगोला जि. सोलापूर श्री. ए. एस. धोंगडे यांना सात दिवस विलंबासाठी रूपये १७५०/- प्रत्येकी शास्ती लावण्यात आली आहे. तथापि अपीलकर्त्या श्रीमती कारंडे यांच्या माहितीच्या अर्जाच्या कालावधीत आपण जन माहिती अधिकारी नव्हतो, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उंबरजे यानी दि. ३०.०६.२०११ च्या निवेदनाव्दारे, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती सांगोला, यानीही तसे दि. २५.०७.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले असल्याने श्री. एफ. एल. उंबरजे, उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, सांगोला, जि. सोलापूर यांची शास्ती रद्द करण्याची विनंती मान्य करण्यात येत असून त्यानुसार आयोगाचा सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :-

## सुधारित आदेश

आयोगाच्या दि. ३०.०५.२०११ रोजीच्या आदेशात पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१) सदर आदेशातील अ. क्र. २ मध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. एफ. एल. उंबरजे याना लावण्यात आलेली शास्ती रू. १७५०/- रद्द करण्यात येत आहे.

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर श्री. जे. आर. आडसूळ यानी दि. २५.०७.२०११ रोजी सादर केलेल्या निवेदनावरून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता श्री. पी. पी. गिड्डे- देशमुख व श्री. ए. एस. धोंगडे, शाखा अभियंता यांना सात दिवस विलंबासाठी रूपये १७५०/- प्रत्येकी शास्ती लावण्यात येत आहे. श्री. पी. पी. गिड्डे- देशमुख व श्री. ए.

एस. धोंगडे यांच्या ऑक्टोबर २०११ या महिन्यात मिळणा-या सप्टेंबर २०११ च्या वेतनातून ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८)माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर यानी करावी व अनुपालन अहवान आयोगाला सादर करावा.

**पुणे** **(विजय कुवळेकर)**
**दि. १५.९.२०११** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अनुपम सराफ
सी-३०३, कॉनकोर्ड प्रोक्झिमा, **अपीलकर्ता**
बाणेर रोड, पुणे-४११ ०१५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (जनरल),** **उत्तरवादी**
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | तक्रार क्रमांक | ३७/२०११/पुणे |

**विवेचन**

तक्रारकर्ता श्री.अनुपम सराफ यानी उप आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या विरुध्द दि.८.४.२०११ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली होती.

श्री.सराफ यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.४.५.२०११ रोजीच्या उप आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदरची तक्रार निकाली काढल्याचे तक्रारदारास दि.३१.५.२०११ रोजी कळविण्यात आले होते. सदरहू विषयासंबंधात पुन्हा त्याच तक्रारीच्या अनुषंगाने दि.४.७.२०११ रोजी तक्रारकर्ता श्री.सराफ यानी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. महापालिकेच्या एक प्रकल्पातील कामाविषयीच्या

व्यवहारासंदर्भातील त्यांचे आक्षेप त्यानी नोंदविले आहेत. आपल्याला प्रतिदिन रु.५००/- नुकसान भरपाई मिळावी, पुणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक व खाजगी भागीदारीत (पी.पी.पी.) कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्याबाबत महापालिका आयुक्तांना निर्देश द्यावेत, तसेच माहिती अधिकाराच्या अंमलबजावणी संदर्भात नियम बनवावेत, अशा स्वरुपाच्या मागण्या त्यानी दोन्ही तक्रारीत केल्या असून त्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १५.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रशांत कांतीलाल धर्मराज
नगरपालिके जवळ, कुर्डवाडी, **अपीलकर्ता**
माढा रोड, ता.माढा, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,**
भूमि अभिलेख, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक,**
भूमि अभिलेख, माढा, वैराग रोड, ता.माढा,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९२/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सि.टी.नं.१३४५ घर नं.३८८ या मिळकतीवर श्री.महंमद नबी उस्मान शेख यांचे नाव ज्या कागदपत्रांच्या आधारे लावण्यात आले त्या कागदपत्रांच्या छायाप्रती | |

**<u>विवेचन</u>**

'माहिती-मागणी अर्जानुसार माहिती न मिळाल्याने मी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. परंतु दरम्यानच्या काळात मला जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांच्याकडून माहिती मिळाली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यास माझी

काहीही हरकत नाही’, असे निवेदन अपीलकर्ता श्री.प्रशांत कांतीलाल धर्मराज यानी दि.१६.८.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-१५.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ.आर.जी.तावरे
अे-११, विजयराज संकुल, **अपीलकर्ता**
सर्व्हे नं.२४४/२/४, औंध-बाणेर,
डी.पी.रोड, पुणे-४११ ००७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा सरकारी वकील,**
जिल्हा सत्र न्यायालय,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
जिल्हा सरकारी वकील यांचे कार्यालय,
जिल्हा सत्र न्यायालय,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१४९/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सहाय्यक सरकारी वकीलांचे अधिकार व कर्तव्याबाबत | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता डॉ.आर.जी.तावरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर शुल्क जोडून फेर अपील दाखल करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २२.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
मु.चाकण, ता.खेड,
जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
पुणे ग्रामीण, पाषाण रोड,
चव्हाण नगर, पुणे-४११ ००८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
खेड उपविभाग, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६२/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.५.५.२०१० व दि.२४.५.२०१० रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,

खेड विभाग, जि.पुणे यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २२.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
मु.चाकण, ता.खेड, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
पुणे ग्रामीण, पाषाण रोड,
चव्हाण नगर, पुणे-४११ ००८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),**
पुणे ग्रामीण, पाषाण रोड,
चव्हाण नगर, पुणे-४११ ००८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६०/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००१ पासूनची पोलीस कल्याण निधीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.बारवकर यानी माहिती-मागणी अर्जान्वये मागील १० वर्षाच्या कालावधीतील सरसकट व अत्यंत विस्तृत माहितीची मागणी केली आहे. माहिती-

मागणी अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यानी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २२.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
मु.चाकण, ता.खेड,
जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
पुणे ग्रामीण, पाषाण रोड,
चव्हाण नगर, पुणे-४११ ००८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
खेड विभाग, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६१/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.५.४.२०१० रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,

खेड विभाग, जि.पुणे यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २२.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.निजलिंगप्पा महादेव इंगळे
१२९, बुधवार पेठ, सोलापूर-२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर),**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सोलापू शहर, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (उपविभाग-अ),**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सोलापूर शहर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१४/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.सुनिल माने यांच्या विद्युत कनेक्शनबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.निजलिंगप्पा महादेव इंगळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या प्रस्तुत अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.इंगळे हे एकाच विषयासंदर्भात विविध सार्वजनिक प्राधिकरणांकडे माहिती-मागणी अर्ज करत असल्याचे दिसून येते. (उदा.सोलापूर

महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित इ.) श्री.इंगळे यांच्या याच विषयासंदर्भातील अन्य अपिलांवर (अपील क्र.२१९/सोलापूर + २२०/सोलापूर) आयोगाने यापूर्वी आदेश पारित केलेले आहेत, तेच आदेश या अपिलातदेखील लागू होतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-१५.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुरेश किसनराव यादव
मु.पो.सोमेश्वर नगर, ता.बारामती **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव,**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वर सचिव,**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४६/२०११/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुरेश किसनराव यादव यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यानी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत माहिती-मागणीचा अर्ज जोडपत्र अ इ.

आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २२.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कृष्णा भाऊ सूर्यवंशी
मु.पो.सावंतपूर, ता.पलूस, **अपीलकर्ता**
जि.सांगली-४१६ ३१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,
जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल),**
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४१/२०११/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** लोकशाही दिनातील अर्जावर कार्यवाही करण्यात कसूर केलेल्या करण्यात आलेल्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करुन अहवाल मिळावा. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.कृष्णा भाऊ सूर्यवंशी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मूळ मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-  २३.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय कृष्ण कुंभार
श्री. पार्थसारथी विश्वास — तक्रारकर्ता
ए-६, अनुपमा सहकारी गृहरचना संस्था बॉडीगेट,
औंध, पुणे- ७

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी (गौण खनिज शाखा), — उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | तक्रार क्रमांक | ४९/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/८/२०११ |

**३. उपस्थित**

**तक्रारकर्ता -** श्री. विजय कृष्णा कुंभार
ए-६, अनुपमा सहकारी गृहरचना संस्था बॉडीगेट, औंध, पुणे- ७

**जन माहिती अधिकारी** (गौण खनिज शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. संजय महादेव बामणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

तक्रारकर्ता - पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील खनिकर्म विभागात खाणपट्टयाबाबतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार अवलोकन करण्यासाठी मिळत नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने पुणे जिल्हयात खाणींना दिलेले परवाने, नियमभंगाबाबत खाणींना दिलेल्या नोटिसा इ. बाबतची माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध होणे आवश्यक अशा स्वरुपाची आहे. तरीही ही माहिती आजही तयार नाही. संकेतस्थळावर ती उपलब्ध करुन देणे दूरच, कागदपत्रांच्या रुपातही ती उपलब्ध नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ६ नुसार माहिती-मागणीसाठी केलेल्या अर्जानुसार काही जुजबी माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी - दीर्घ मुदतीच्या खाणपट्टयांचे लिलाव व अन्य काही माहिती संगणकावर उपलब्ध होती ती सर्व माहिती तक्रारदारांना दिली. संपूर्ण जिल्हयासाठी या विभागात मी एकटाच अधिकारी असून एकच लिपिक कर्मचारी आहे. संबंधित अन्य अधिकाऱ्यांकडून गौण खनिजाबाबतचा तपशीलवार अहवाल मागवूनही प्राप्त झालेला नाही. 'दि. ३०/६/२०११ ते ५/७/२०११ या काळात एक विशेष मोहिम घेऊन दीर्घ मुदतीच्या खाणपट्टयांचे सर्वेक्षण करावे', असे आदेश पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दि.२०/६/२०११ च्या पत्रान्वये सर्व तहसीलदार/ उपविभागीय अधिकारी यांना दिले होते. त्यात परवान्यापेक्षा जादा गौण खनिज उत्खनन केले असल्यास दंडात्मक कारवाई करण्यासह १२ मुद्दयांचा समावेश होता. त्यानुसार अहवाल प्राप्त न झाल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार दि. १/८/२०११ च्या पत्रान्वये पुन्हा सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना स्मरणपत्र पाठविले. परंतु अद्याप त्यानुसार माहिती प्राप्त झालेली नाही.

सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील गाभाभूत तत्त्व आहे, आणि तक्रारकर्त्यांनी मांडलेला विषय सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. दीर्घ मुदतीच्या खाणपट्टयांमधील उत्खनन, अटी व शर्तींचे पालन, शासनाने जमा करावयाची रॉयल्टी इ. बाबींचा समावेश त्यात असून हा विषय व्यापक सार्वजनिक हिताशी निगडित आहे, व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम च्या कलम ४ मध्ये तो अंतर्भूत होतो.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार ही सर्व माहिती शासनाने/ सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंस्फूर्तीने जाहीर करणे व या विषयासंदर्भात त्या त्या वेळी होणारी कार्यवाही, निर्णय यासह अनुषंगिक अशी माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे. संकेतस्थळावर ती उपलब्ध होणे आवश्यक आहे, परंतु तशी ती उपलब्ध नसल्यास कागदपत्रांच्या स्वरुपात कोणत्याही नागरिकाला केव्हाही ती मिळाली पाहिजे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ती कायमस्वरुपी उपलब्ध नाही. एवढेच नव्हे, तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (६) नुसार अर्ज करुन मागितल्यानंतरही ती परिपूर्ण मिळत नाही, ही बाब गंभीर आहे. वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मंजूर झ ााल्यापासून - दि. १२ ऑक्टोबर २००५ पासून - १२० दिवसांत यानुसार कार्यवाही करणे सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना बंधनकारक असल्याचे कायद्यातच नमूद आहे. तरीही ५ वर्षे उलटून गेल्यानंतरही त्याची पूर्तता होत नाही, ही बाब आक्षेपार्ह असून नियमभंग ठरणारी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणी ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय प्रमुखाची, म्हणजे प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, पुणे यांची जबाबदारी आहे. ही जबाबदारी लक्षात घेता नागरिकांना माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ नुसार ते जन माहिती अधिकारी ठरतात. माहिती उपलब्ध न झाल्यास/नाकारण्यास कारणीभूत ठरल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी कारवाईस पात्र ठरतात. तथापि प्रस्तुत विषयात जिल्हाधिकारी, पुणे हे जन माहिती अधिकारी ठरत असले, तरी त्यानी जिल्हयातील सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना अद्ययावत माहिती सादर करण्याच्या लेखी सूचना दि. ३०/६/२०११ व ५/७/२०११ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. त्या लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (४, ५) नुसार संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकारी जन माहिती अधिकारी ठरतात. त्यामुळे माहिती देण्याची त्यांची जबाबदारी असून त्यानुसार पूर्तता न झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० नुसार शास्ती व अन्य कारवाईस ते पात्र ठरतील.

सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. ६४५४/२०११ प्रकरणी दि. ९/८/२०११ रोजी दिलेल्या निर्णयात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ चे महत्त्व ठळकपणे अधोरेखित केले आहे.

“The power under section 19 (8) of the Act in intended to be used by the commissions to ensure compliance with the Act, in particular ensure that every public authority maintains its records duly catalogued and indexed in the manner and in the form which facilitates the right to information and ensure that the records are computerized, as required under clause (a) of setion 4 (1) of the Act; and to ensure that the information enumerated in clauses (b) and (c) of sections 4(1) of the Act are Published and disseminated, and are periodically updated as provided in sub section (3) and (4) of section 4 of the Act. If the ‘Infromation’ enumerated in clause (b) of section 4 (1) of the Act are effectively disseminated (by publications in print and on websites and other effective means), apart from providing transparency and accountability, citizens will be able to access relevant information and avoid unnecessary application for information under the Act.

“The right to information is a cherished right. Information and right to information are intended to be formidable tools in the hands of responsible citizens to fight corruption and to bring the transparency and accountability. The provisions of RTI Act should be enforced strictly and all efforts should be made to bring to light the necessary information under clause (b) of section 4(1) of the Act which related to securing transparency and accountability in the working of public authorities and in discouraging corruption”, असे सर्वोच्च न्यायालयाने या निकालात म्हटले आहे. त्याची जाणीव या संदर्भात सर्व संबंधितांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. तक्रार मान्य करण्यात येत आहे.

२. पुणे जिल्हयातील दीर्घ मुदतीच्या खाणपट्टयांमधील उत्खनन, अटी व शर्तीचे पालन, शासनाने जमा करावयाची रॉयल्टी इ. बाबींच्या संदर्भात जिल्हाधिकारी,पुणे यानी जिल्हयातील सर्व

तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना दि. ३०/६/२०११ व ५/७/२०११ च्या पत्रान्वये दिलेल्या लेखी सूचनांनुसार सर्व मुद्दयांबाबतची माहिती जिल्हयातील सर्व तहसीलदार/ उपविभागीय अधिकारी यांनी दि. २०/९/२०११ पर्यंत जिल्हाधिकारी, पुणे याना सादर करावी, यानुसार कार्यवाही केल्याचे आयोगास अवगत करावे, व जिल्हाधिकारी, पुणे यानी दि. २५/९/२०११ पर्यंत ती माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार संकेत स्थळावर/लेखी स्वरुपात उपलब्ध ठेवण्याची व्यवस्था करुन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा. यानुसार कार्यवाही न झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार सर्व संबंधित शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बादशहा बुऱ्हाण मुल्ला
मु.पो.देगांव, ता.उत्तर सोलापूर, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती दक्षिण सोलापूर,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत औज (अ), ता.दक्षिण सोलापूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५६/२०११/सोलापूर<br>२२५७/२०११/सोलापूर<br>२२५८/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सेवानिवृत्ती उपदानातून करण्यात आलेल्या वसुलीसंदर्भात | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.बादशहा बुऱ्हाण मुल्ला यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यानी राज्य माहिती आयोग, पुणे

खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.मुल्ला यांच्या अपिलावर (अपील क्र.१९९५/२००९/सोलापूर) प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यानी दि.३०.७.२०१० रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे एकूण ३ अपिले दाखल केली असल्याचे दिसून येते. राज्य माहिती आयुक्तांच्या आदेशाविरुध्द राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे अपील करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- २३.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बादशहा बुऱ्हाण मुल्ला
मु.पो.देगांव, ता.उत्तर सोलापूर, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती दक्षिण सोलापूर,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत औज (अ), ता.दक्षिण सोलापूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५६/२०११/सोलापूर<br>२२५७/२०११/सोलापूर<br>२२५८/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सेवानिवृत्ती उपदानातून करण्यात आलेल्या वसुलीसंदर्भात | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.बादशहा बुऱ्हाण मुल्ला यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यानी राज्य माहिती आयोग, पुणे

खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.मुल्ला यांच्या अपिलावर (अपील क्र.१९९५/२००९/सोलापूर) प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यानी दि.३०.७.२०१० रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे एकूण ३ अपिले दाखल केली असल्याचे दिसून येते. राज्य माहिती आयुक्तांच्या आदेशाविरुध्द राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे अपील करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- २३.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर बबन काटकर
ठी/२/१०, पोलीस अधिकारी निवासस्थान, **अपीलकर्ता**
सोमवार पेठ, पुणे-४११ ०११

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वर सचिव/कक्ष अधिकारी,**
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४४/२०११/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर बबन काटकर यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यानी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत मूळ माहिती-मागणी अर्ज जोडपत्र अ, प्रथम

अपील अर्ज जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामचंद्र नारायण जाधव
२०, बालसम्राट चौक,
सांगलीवाडी, सांगली-४१६ ४१६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार (मिरज विभाग),**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३४/२०११/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मिरज येथील अमर टॉकीज व कुबेर हॉटेल च्या बाजूस असलेले सर्वश्री आचार्य, अभ्यंकर व इनामदार यांनी केलेल्या अर्जाच्यासंदर्भातील कार्यवाहीचा तपशील | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.रामचंद्र नारायण जाधव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अच्युत जनार्दन इनामदार
नादब्रह्म सोसायटी, सितार बिल्डिंग,
फ्लॅट नं.२१/२अ, वारजे,
पुणे-४११ ०५२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४३/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.अ.ज.इनामदार, पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन यांच्या दि.२५.६.२००५ रोजीच्या पत्रासंदर्भात | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.अच्युत जनार्दन इनामदार यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यानी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता श्री.इनामदार यांच्या

याच विषयासंदर्भातील अपील क्र.१७६८/२०११/पुणे ते १७७३/२०११/पुणे या अपिलांमध्ये यापूर्वी आयोगाने वेळोवेळी निर्णय दिलेले आहेत. एकाच विषयासंदर्भात व्यक्तिगत स्वरुपाच्या प्रकरणी वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणांकडे सातत्याने माहितीची मागणी करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज श्री.इनामदार याना देण्यात येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अपील क्र. ६४५४/२०११ प्रकरणी दि. ९/८/२०११ रोजी दिलेल्या निकालात अशा स्वरुपाच्या माहिती-मागणी अर्जांच्या संदर्भात मार्गदर्शक अभिप्राय दिला आहे

'Indiscriminate and impractical demands or directions under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter-productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged downwith the non-productive work of collecting and furnishing information', असे सर्वोच्च न्यायालयाने अपील क्र. ६४५४/२०११ प्रकरणी दि. ९/८/२०११ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे म्हटले आहे, याची जाणीव श्री.इनामदार याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विलास कृष्णाजी कुलकर्णी
१७ अ, चंदगुप्त गृहनिर्माण सहकारी संस्था, **अपीलकर्ता**
श्रीयश बंगला, जुन्या कचरा डेपो समोर,
पौड रोड, कोथरुड, पुणे-४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव (मत्स्य),**
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पदुम-१२),**
कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४५/२०११/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.विलास कृष्णाजी कुलकर्णी यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यानी राज्य माहिती आयोग, पुणे

खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत मूळ माहिती-मागणी अर्ज जोडपत्र अ, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २२.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.तुकाराम मुरलीधर भादुले
मु.पो.निमसोड, ता.खटाव, **अपीलकर्ता**
जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय खटाव (वडूज),
ता.खटाव, जि.सातारा

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय खटाव (वडूज),
ता.खटाव, जि.सातारा

**२. जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून,**
पुरवठा शाखा, तहसील कार्यालय खटाव (वडूज),
ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७६/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** निमसोड येथील कमी करण्यात आलेल्या ६०७ शिधापत्रिकांबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.तुकाराम मुरलीधर भादुले यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम

१९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीनंतर केले असल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

२।२१

१७+१८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडप्रीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गजानन भिकाजी कुंभार
सरस्वती नगर, बर्फाचे कारखान्यासमोर,
इंदापूर, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९१/२०११/पुणे + २४९२/२०११/पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शासकीय जमीन आपल्याला मिळावी, या मागणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जानुसार चौकशी करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयाला दिली होती. परंतु त्यानुसार योग्य चौकशी व कार्यवाही झाली नाही, अशी अपीलकर्ता श्री. गजानन भिकाजी कुंभार यांची तक्रार असून या संदर्भात आयोगाने यापूर्वी त्यांच्या अपील क्र. २१२१/२०१०/पुणे या अपिलावर आदेश पारित केलेले

आहेत. त्याच मागणीसाठी अपीलकर्ता यानी नव्याने दोन अपिले दि. १३/९/२०११ व दि. १५/९/२०११ रोजी सादर केली आहेत. आयोगाचा यापूर्वीचाच निर्णय प्रस्तुत अपिलांमध्येही लागू आहे. वैयक्तिक स्वरुपाच्या, तसेच प्रशासकीय कार्यवाहीची मागणी असलेल्या एकाच विषयासाठी वेळोवेळी माहितीच्या अधिकारात अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणेचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करु नये. याच विषयाबाबत याच मागणीसाठी अपीलकर्त्यांनी आयोगाकडे पुन्हा अपील केल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
27 SEP 2011

K/28/Sept

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.प्राची प्रशांत कुंभारे
प्रगती पार्क, प्लॉट नं.५९, रो.हाऊसनं.१, **अपीलकर्ता**
सेक्टर नं.९६,राजेशिवाजीनगर, चिखली,
चिंचवड, पुणे-१९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
हायस्कूल सोसायटी, सावनेर,

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,**
रविनगर शिक्षण विभाग, जि.नागपूर

**२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
भालेराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,
सावनेर, जि.नागपूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२९/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकी मिळणेबाबत. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या सौ.प्राची प्रशांत कुंभार यानी राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, नागपूर यानी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकी मिळण्यास विलंब का झाला, कोण जबाबदार इ.च्या स्पष्टीकरणाची अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामचंद्र नारायण जाधव
२०, बालसम्राट चौक, **अपीलकर्ता**
सांगलीवाडी, सांगली-४१६ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त,**
सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय,
उद्योगभवन, विश्रामबाग, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी,**
सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय,
उद्योगभवन, विश्रामबाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३१/२०११/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.भिसे, सहाय्यक कामगार आयुक्त यांनी पदभार स्विकारल्यापासूनची त्यांची शासकीय दैनंदिनी, रोजच्या कामाचे नियोजन, कामे केलेल्या टिपण्या, रोजनामा व वरिष्ठांना सादर केलेल्या कामाचा अहवाल | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामचंद्र नारायण जाधव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार

आयुक्त कार्यालय, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, सांगली यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दगडू तुळशीराम सोनवले
मु.पो.लक्ष्मीदहिवडी, **अपीलकर्ता**
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
पंचायत समिती मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०२/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.लक्ष्मीदहिवडी येथील शासकीय घरकुल योजना व पाण्याच्या हौदाच्या शासकीय निधीतून केलेल्या बांधकामाच्या संदर्भातील खुलासेवजा स्वरुपाची माहिती. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.दगडू तुळशीराम सोनवले यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत

समिती मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर यानी अपीलकर्त्यास मुद्देनिहाय दिलेले उत्तर योग्य आहे. अपीलकर्त्याने माहिती-मागणी अर्जाद्वारे उपस्थित केलेले प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे आक्षेप हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामचंद्र नारायण जाधव
२०, बालसम्राट चौक,
सांगलीवाडी, सांगली-४१६ ४१६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त,**
सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय,
उद्योगभवन, विश्रामबाग, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी,**
सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय,
उद्योगभवन, विश्रामबाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३३/२०११/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.भिसे, सहाय्यक कामगार आयुक्त यानी पदभार स्वीकारल्यापासूनची त्यांची शासकीय दैनंदिनी, रोजच्या कामाचे नियोजन, कामे केलेल्या टिपण्या, रोजनामा व वरिष्ठांना सादर केलेल्या कामाचा अहवाल | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.रामचंद्र नारायण जाधव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार

आयुक्त कार्यालय, सांगली यानी माहिती-मागणी अर्जास दिलेल्या उत्तरानुसार अपीलकर्त्याने शुल्क भरणे आवश्यक आहे. त्यानी शुल्क न भरता आयोगाकडे अपील केले असून त्यासंदर्भातील कोणताही खुलासा अपीलकर्त्याने नमूद केलेला नाही. अपीलकर्त्याने आवश्यक तर शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रदिप मानसिंग कदम
मु.पो.लोहोम, ता.खंडाळा, **अपीलकर्ता**
जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती खंडाळ,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत झगलवाडी,
ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२३/२०११/सातारा |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.प्रदिप मानसिंग कदम यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत माहिती-मागणी अर्ज जोडपत्र अ, प्रथम अपील अर्ज जोडपत्र ब, अपिलीय

प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेरसादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.ए.के.शेख
घर नं.२५९०, मिरज रोड,
ता.सांगोला, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),**
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
सांगोला सहकारी साखर कारखाना,
ता.सांगोला, जि.सोलापूर

**२.जन माहिती अधिकारी तथा,**
साखर आयुक्त कार्यालय,
स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७७/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.ए.के.शेख सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर यानी केलेले काम, दिलेला ॲडव्हान्स, उर्वरित रक्कम इ.बाबतची विहित नमुन्यात माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.ए.के.शेख यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्यानी एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रघुनाथ दशरथ शेटये
मंगलमूर्ती कॉलनी, कोल्हापूर नृ.वाडी बायपास रोड, **अपीलकर्ता**
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर-४१६ १०१

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (विभागीय चौकशी),** **उत्तरवादी**
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१२/२०११/कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वेतनातून केलेल्या वसुलीबाबत. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रघुनाथ दशरथ शेटये यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.हरीभाऊ उमाजी गावडे
पो.गावडेवाडी, व्हाया अवसरी खुर्द, **अपीलकर्ता**
जि.पुणे-४१२ ४०५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
विधानभवन समोर, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक आस्था-३,**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
विधानभवन समोर, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३३/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शासनाच्या दि.६.२.२०१० रोजीच्या परिपत्रकानुसार पोट हिस्सा मोजणीचे विस्तृत स्पष्टीकरण मिळणेबाबत | |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.हरीभाऊ उमाजी गावडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्यानी माहिती-मागणी अर्जानुसार केलेली जमीन मोजणीबाबतचे स्पष्टीकरण देण्याची त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. पांडुरंग गंगाधर दिक्षित
घर नं.२७७७, इनामदार सदन,
जुनी माळी गल्ली, पंढरपूर,
जि.सोलापूर-४१३ ३०४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३४/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शासकीय कार्यालयातील कागदपत्रे व धारिकांच्या वर्गीकरणासंदर्भातील शासन परिपत्रके इ.बाबतची माहिती | |

## विवेचन

दरम्यान 'अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून मला आवश्यक असणारी माहिती प्राप्त झाली असल्याने राज्य माहिती आयोगाकडे दाखल

केलेले द्वितीय अपील निकाली काढण्यास हरकत नाही', असे निवेदन श्री.दिक्षित यानी आयोगाला सादर केले. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दिगंबर शंकर गिरमे
सि.स.नं.४२२, कसबा पेठ, **अपीलकर्ता**
पुणे-४११ ०११

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
गृह विभाग, १३, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
गृह विभाग, १३, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४०/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** फरासखाना पोलीस स्टेशन मधील चॅप्टर केस क्र.१५३/९३ प्रकरणी पोलिसांनी केलेल्या चुकीच्या कारवाईबद्दल नुकसान भरपाई मिळण्याबाबत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दिगंबर शंकर गिरमे यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यानी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता

श्री.गिरमे यांच्या याच आशयाच्या अन्य अपिलांवर (अपील क्र.४१५/पुणे, १३८०/पुणे व २९०४/पुणे व २०७७/२०११/पुणे ) आयोगाने वेळोवेळी आदेश पारित केलेले आहेत. तेच आदेश प्रस्तुत अपिलामध्येही लागू होतात. श्री.गिरमे यांच्या माहिती-मागणी अर्ज व अपिलामध्ये सार्वजनिक हिताचा कोणताही संदर्भ अंतर्भूत नसून व्यक्तिगत स्वरुपाचा विषय सातत्याने अर्ज, अपिले, पत्रव्यवहार याद्वारे मांडत आहेत. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.महारुद्र कडाजी तिकुंडे
न्यू विकासनगर, संगमनगर, **अपीलकर्ता**
ता. व जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती सातारा,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत खिंडवाडी,
ता. व जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१५/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत खिंडवाडीचे पाणीपुरवठा कॅश बुक, जनरल कॅश बुक इ.सन २००८ ते २०११ या कालावधीतील छायाप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.महारुद्र कडाजी तिकुंडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.तिकुंडे यानी मागणी केलेली माहिती ही अत्यंत विस्तृत स्वरुपाची असल्याने जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खिंडवाडी, ता. व जि.सातारा

यानी दिलेले उत्तर योग्य आहे. अपीलकर्त्याने अभिलेख अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची लेखी मागणी करावी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खिंडवाडी, ता. व जि.सातारा यानी ग्रामपंचायतीतील उपलब्ध अनुदानात शक्य तितकी माहिती अपीलकर्त्यास द्यावी, अशी कार्यपध्दती अवलंबविणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा रजिस्ट्रार (इन्स्पेक्शन १),**
मुंबई उच्च न्यायालय,
मुंबई

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मास्टर अँड असि.प्रोथोनोटरी (ॲडमिनस्ट्रेशन),**
मुंबई उच्च न्यायालय,
मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०६/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अवमान याचिका क्र.२४०/०१ प्रकरणी अंतिम सुनावणी केव्हा होणार, झालेल्या नुकसानीस जबाबदार कोण इ. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा मास्टर अँड असि.प्रोथोनोटरी (ॲडमिनस्ट्रेशन), मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांची कार्यवाही व अपिलीय प्राधिकारी तथा रजिस्ट्रार

(इन्स्पेक्शन १), मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचा निर्णय योग्य आहे. 'न्यायालयीन प्रकरणाचा निकाल केव्हा होणार?' ही विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत माहिती ठरत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संजीव विनायक गडकरी
क्र.३, भक्तीमाधव सहकारी गृहरचना, **अपीलकर्ता**
४०१/४०२, यशवंतनगर,
तळेगांव, पुणे-४१० ५०७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
तळेगांव दाभाडे नगरपरिषद,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक,**
तळेगांव दाभाडे नगरपरिषद,
तळेगांव दाभाडे, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२८/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मालमत्तेचे पुर्नमूल्यांकन व त्यासंदर्भातील नगरविकास विभागाच्या नियमावलीची छायाप्रत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.संजीव विनायक गडकरी याना त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार माहिती प्राप्त न झाल्याने त्यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. दरम्यान 'जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक, तळेगांव दाभाडे नगरपरिषद, जि.पुणे यानी मला माहिती दिली असून सदर माहितीने माझे

समाधान झाल्याने माझे द्वितीय अपील मागे घेत आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.गडकरी यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बादशहा हुसेन कुलाणी
मु.पो.वडूज, ता.खटाव, **अपीलकर्ता**
जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष,**
सातारा डिस्ट्रिक्ट सुपरव्हिजन को.ऑप.सोसायटी मर्यादित,
सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव,**
सातारा डिस्ट्रिक्ट सुपरव्हिजन को.ऑप.सोसायटी मर्यादित,
सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१७/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पणन संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारासंबंधीची कागदपत्रे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.बादशहा हुसेन कुलाणी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, सातारा डिस्ट्रिक्ट सुपरव्हिजन को.ऑप.सोसायटी मर्यादित, सातारा यानी दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कुरेशी अब्दुल्लाह म.शुकुर
२८७, बेगम पेठ, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७४/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडील अपील क्र.१७२६/२०१०/सोलापूर निकाली काढल्याच्या अनुषंगाने खुलासा व आयोगाच्या आदेशाविरुध्द कोठे अपील करावे याबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.कुरेशी अब्दुल्लाह म.शुकुर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती

आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संतोष गोयल
३८४, नवीन रास्ता पेठ, पुणे - ११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा दि पूना क्लब लि.,
बंडगार्डन रोड, पुणे- १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दि पूना क्लब लि.,
बंडगार्डन रोड, पुणे- १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५९/पुणे |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९/३/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि. २६/११/२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता श्री. संतोष गोयल व 'पूना क्लब लि.',च्या प्रतिनिधी श्रीमती बी.एम.पिंगळे हे उपस्थित होते.

'पूना क्लब लि.',६ बंडगार्डन रोड, पुणे - १ या संस्थेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचे कारण देऊन माहिती नाकारली. संस्थेला शासनाने १५० एकरहून अधिक जमीन सवलतीच्या दराने भाडेपट्टयाने दिली असून गोल्फ कोर्सच्या विकासासाठी ४० लाख रुपये अनुदान केंद्र सरकारने दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) अन्वये शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भरीव मदत मिळालेली संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते. त्यामुळे 'पूना क्लब

लि.'ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरुन तिला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, म्हणून संस्थेने माहिती दिली पाहिजे, अशी मागणी अपलकर्ता श्री. संतोष गोयल यानी केली.

शासनाने 'पूना क्लब'ला दिलेली जमीन भाडेपट्टयाने दिली असून कोणतीही सवलत दिलेली नाही. सरकारकडून संस्थेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या मदत मिळत अथवा मिळालेली नाही. गोल्फ कोर्ससाठी सरकारने भरीव मदत केलेली नाही. संस्था खाजगी स्वरुपाची असून कंपनी ॲक्ट, १९१३- खाली नोंदणी झालेली आहे. तसेच सरकारने 'पूना क्लब' ला १५० एकरहून अधिक जमीन सवलतीच्या दराने भाडेपट्टयाने दिलेली असल्याचे अपीलकर्त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदी लक्षात घेता 'पूना क्लब'हे 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही व या क्लबला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू हात नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन क्लबच्या प्रतिनिधी श्रीमती बी.एम.पिंगळे यानी केले.

उभय बाजूंनी आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ लेखी पुरावे पंधरा दिवसांत सादर करावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानंतर उभय बाजूंतर्फे सादर करण्यात आलेली कागदपत्रे, आयोगाने उभय बाजूंना केलेली विचारणा व अनुषंगिक पत्रव्यवहार यातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे :

<u>दि. १६.४.२००८</u>- 'पूना क्लब लि.'ही स्वयंसेवी संस्था असून गोल्फ मैदानासाठी शासनाकडून मदत मिळालेली नाही. शासनाकडून क्लबला १५० एकरहून अधिक जमीन सवलतीच्या भाडेपट्टयाने मिळाली असल्याचे श्री. गोयल यांचे प्रतिपादन चुकीचे आहे. शासनाने भाडपट्टयाने दिलेल्या जमिनीचे भाडे क्लबतर्फे वेळोवेळी दिले जाते, असे कर्नल आर. के. पुनी (निवृत्त), उप सचिव (सामान्य प्रशासन), पूना क्लब लि., पुणे यानी आयोगाला कळविले.

<u>दि. १७.५.२००८</u>- संस्थेला शासनाकडून मिळालेली जमीन, मिळणारे शासकीय अनुदान व सवलती याबाबतचा तपशील सादर करण्याचे आदेश आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव, पूना क्लब लि.,पुणे याना दिले.

<u>दि. १९.५.२००८</u>- सरकारने क्लबला कोणतेही अनुदान अथवा जमीन दिलेली नाही. सरकारने भाटेपट्टयाने क्लबला दिलेल्या जमिनीचे भाडे वेळोवेळी ठरविले जाते व त्यानुसार क्लबतर्फे अदा केले

जाते. क्लबला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी म्हणून कोणाचीच नियुक्ती केलेली नाही, असे ब्रिगे. विलास देवगिरीकर (निवृत्त), मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव, पूना क्लब लि., पुणे यानी आयोगाला कळविले.

दि. १३.१.२००९- गोल्फ कोर्सच्या विकासासाठी/दर्जा सुधारण्यासाठी केंद्र सरकारकडून ४० लाख रुपये अनुदान मिळाल्याचे क्लबच्या १९९६-९७ च्या वार्षिक अहवालात नमूद केले आहे. शासनाकडून कोणतेही अनुदान न मिळाल्याचे कळवून क्लबने आयोगाची दिशाभूल केली आहे, असे निवेदन श्री. गोयल यानी क्लबच्या वार्षिक अहवालाच्या प्रतीसह आयोगाला सादर केले.

दि. १३.२.२००९- क्लबचे अनुदानाबाबतचे प्रतिपादन व वार्षिक अहवालातील नोंद यातील तफावत, तसेच शासनाने दिलेल्या जमिनीबाबतची सवलत आदींची माहिती आठ दिवसांत सादर करण्याचे निर्देश पूना क्लबचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव याना आयोगाने दिले.

दि. १६.२.२००९- क्लबचे मानद सचीव श्री. शांतीलाल संघवी यांची अँजिओप्लास्टी झाली असून सहा आठवडे वैद्यकीय विश्रांतीचा सल्ला असल्यामुळे उत्तर देण्यास मुदत देण्याची क्लबची आयोगाला विनंती.

दि. २२.४.२००९- सहा आठवडयांच्या मुदतीनंतरही माहिती सादर न केल्याबाबत आयोगाकडून क्लबला खुलाशाची विचारणा.

दि. २०.६.२००९- पूना क्लबकडून दि. २२.४.२००९ च्या पत्रान्वये कोणताही खुलासा प्राप्त न झ ाल्यामुळे खुलासा सादर करण्याची क्लबला शेवटची संधी देण्यात येत असल्याचे व एक आठवडयात खुलासा न केल्यास कारवाई करण्यात येईल, अशी समज सचीव, पूना क्लब लि., याना आयोगाने दिली.

दि. ७.७.२००९ - आयोगाचे पत्र क्लबला दि. १.७.२००९ रोजी प्राप्त झाले. पूना क्लब हा जिमखाना क्लब असून ऑगस्ट १९३१ मध्ये लिमिटेड कंपनी म्हणून स्थापन झाला. शासनाचा कायदा अथवा अधिसूचना याद्वारे स्थापित झालेली ही संस्था नाही. क्लबला सरकारने जमीन दिली नसून क्लबने सरकारकडून भाडेपट्टयाने जमीन घेतलेली आहे. १५ वर्षांपूर्वी (सन १९९४ मध्ये) केंद्र सरकारच्या पर्यटन विभागाने गोल्फ पर्यटन विकास योजनेअंतर्गत गोल्फ क्लबचा दर्जा सुधारणे व साधन सामग्रीची खरेदी यासाठी ४८ लाख रुपयांची मदत दिली. सरकारने एका योजनेअंतर्गत विशिष्ट कारणासाठी एकदाच दिलेली ही मदत असून शासनाकडून अन्य काणतेही अनुदान वा मदत क्लबला मिळालेली

नाही. प्रामुख्याने क्लबच्या सभासदांकडून मिळणारी वर्गणी व संस्थेतर्फे पुरविल्या जाणा-या सेवा-सुविधांपोटी मिळणारी रक्कम यातून क्लबला निधी मिळतो. या बाबी लक्षात घेता क्लबला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही व त्यामुळे श्री. गोयल याना माहिती देणे क्लबवर बंधनकारक नाही, असे निवेदन बिग्रे. एच. चुकेरबट्टी (निवृत्त), मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव, पूना क्लब, पुणे यानी आयोगाला सादर केले.

दि. ९.९.२००९- क्लबला भाडेपट्टयाने दिलेल्या जागेच्या संदर्भातील व शासनातर्फे देण्यात येणारे अनुदान, सवलती आदींबाबतचा तपशील आयोगाला सादर करण्याचे जिल्हाधिकारी , पुणे तसेच सचिव, पूना क्लब लि., यांना आयोगाचे पत्र.

दि. २४.९.२००९- पूना क्लबला भाडेपट्टयाने मिळालेल्या जमिनीचे भाडे सर्वसाधारण दराने दिले जाते. मिळकत कर, पाणीपट्टी कर यात अथवा अन्य कोणत्याही कर आकारणीत पुणे महानगरपालिका किंवा कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्याकडून कोणतीही सवलत मिळत नाही, असे ले.कर्नल के.एस.एस. जमवाल (निवृत्त), सचीव, पूना क्लब यांचे आयोगाला पत्र.

दि.३०.९.२००९- पूना क्लबला दिलेली जागा भाडेपट्टयाने देताना सवलतीच्या दराने दिली असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यानी आयोगाला कळविले. त्यांच्या पत्रातील निवेदन पुढीलप्रमाणे आहेः

"मौजे बंडगार्डन रोड येथील १४ एकर ३ गुंठे ( ५ हेक्टर ६९ आर) क्षेत्र प्रथमतः मे. पूना क्लब लि.(पूर्वीचे नाव 'असेंम्ब्ली पब्लिक रिक्रिऐशन') या संस्थेस मनोरंजन, व्यायाम व करमणुकीचे खेळाव्दारे सदस्यांना सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु. १३/- वार्षिक भाडे आकारुन दि. १ जानेवारी १८८५ पासून ९९ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आले होते. सदर भाडेपट्टयाची मुदत दि. ३१/१२/१९८३ रोजी संपुष्टात आली आहे. यानंतर शासनाचे महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील ज्ञापन क्र. जमीन/१४६५/प्रक्रपु.१२२/९०/ज-५, दि. २९/३/२००० अन्वये पूना क्लब, बंडगार्डन, पुणे याना दि. १/१/१९८४ पासून ते दि. ३१/१२/२०१३ या ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने मंजुरी दिलेली आहे.

"प्रस्तुत क्षेत्राचा भाडेपट्टा १/१/१९८४ ते १०/५/१९८४ या कालावधीसाठी दि. १/१/१९८४ रोजी अस्तित्वात असलेल्या प्रस्तावित बाजारभावाच्या ५० टक्के रक्कमेच्या ८ टक्के रक्कम, दि.११/५/१९८४ ते ३०/६/१९९२ या कालावधीसाठी दि. १/२/१९७६ च्या बाजारभावाच्या १० टक्के रक्कमेच्या ८ टक्के व

दि. १/७/१९९२ ते ७/७/१९९९ या कालावधीसाठी दि. १/२/१९७६ ते ३१/१२/२०१३ या कालावधीसाठी दि. १/२/१९७६ च्या बाजारभावाच्या १० टक्के रक्कमेच्या प्रत्येक वर्षी १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडिंग रेट"च्या दराइतका भाडेपट्टा आकारण्यात आलेला आहे.

"यानुसार सदर संस्थेस देण्यात आलेली जागा ही भाडेपट्ट्याने देताना सवलतीच्या दराने दिली आहे, हे दिसून येते".

दि. २७.१०.२००९- दि. ८/११/१९७७ रोजी महाराष्ट्र शासनाने एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे येथे 'पूना क्लब'ला गोल्फ कोर्ससाठी सुमारे १३४ एकर १९ गुंठे ( ३ लाख ६९ हजार चौ.मी.) जमीन वार्षिक रु. २६,८८५/- (प्रतिवर्षी रु. २००/- प्रति एकरप्रमाणे) या अत्यंत सवलतीच्या दराने दिल्याच्या भाडेपट्टा कराराची प्रत, बंडगार्डन रोड, पुणे येथे अन्य ठिकाणी सुमारे ५६,९४०/- चौ.मी. जमीन महाराष्ट्र शासनाने दि. १ फेब्रुवारी १९७६ रोजी प्रचलित असलेल्या बाजारभावाच्या १० टक्के दराने वार्षिक भाडे आकारणी करण्याच्या दि. ३१ डिसेंबर २०१३ पर्यंतच्या भाडेपट्टा कराराची प्रत ही कागदपत्रे जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन श्री. गोयल यानी आयोगाला सादर केली. दि. १ जानेवारी १९८४ ते दि. ३१ डिसेंबर २००२ या कालावधीत या भूखंडासाठी पुढीलप्रमाणे भाडे आकारणी केल्याचे त्यात नमूद आहेः

## भाडेपट्टा आकारणी

| | | |
|---|---|---|
| (अ) | १ जानेवारी १९८४ ते १० मे १९८४ | रु. ४,०५,३१५/- |
| (ब) | ११ मे १९८४ ते ३० जून १९९२ | रु. ४,२६,०९८/- |
| (क) | १ जुलै १९९२ ते ७ जुलै १९९९ | रु. ६,८८,९५३/- |
| (ड) | ८ जुले १९९२ ते ३१ डिसेंबर १९९२ | रु. ४१,२५१/- |
| (इ) | १ जानेवारी २००० ते ३१ डिसेंबर २००१ | रु. १,५७,०४४/- |
| (फ) | १ जानेवारी २००२ ते ३१ डिसेंबर २००२ | रु. ७५,२५०/- |
| | | एकूण - रु. १७,९३,९११/- |

दि. २३.१२.२०१०- 'पूना क्लब'ला दिलेल्या जागांची शासनाने निर्धारित केलेल्या बाजारभावा-

नुसार (Ready Reckoner Value) होणारी किंमत रु. १ अब्ज ८६ कोटी ८१ लाख ६० हजार (येरवडा येथील जमीन) व रु. ६१ कोटी ८८ लाख ८८ हजार ५१२ (बंडगार्डन रोड येथील जमीन) असल्याचे सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) हवेली क्र. ११ यानी दिलेल्या दि. ६/११/२०१० व दि. १/१२/२०१० च्या प्रमाण- पत्राव्दारे दिसून येते,असे निवेदन श्री.गोयल यानी या प्रमाणपत्रांच्या प्रतींसह आयोगाला सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता, 'पूना क्लब लि., ६, बंडगार्डन रोड, पुणे' ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते की नाही, हा प्रस्तुत अपिलातील निर्णयाचा मुख्य विषय आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मध्ये 'सार्वजनिक प्राधिकरण' याची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे:

(h) "public authority" means any authority or body or institution of self government established or constituted-

(a) by or under the Constitution;
(b) by any other law made by parliament;
(c) by any other law made by State Legislature;
(d) by notification issued or order made by the appropriate Government,

and includes any-

(i) Body owned, controlled or substantially financed;
(ii) Non-Government organization substantially financed, directly or indirectly by funds provided by the appropriate Government;

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यातून पुढील बाबी स्पष्ट होतातः

१) 'पूना क्लब लि., ६, बंडगार्डन रोड, पुणे- १' या संस्थेला महाराष्ट्र शासनाने बंडगार्डन रोड, पुणे येथे सुमारे ५६,९४०/- चौ.मी. जमीन दि. १/२/१९७६ रोजी प्रचलित असलेल्या बाजारभावाच्या १० टक्के दराने वार्षिक भाडे आकारणी तत्त्वावर दिली आहे.

२)एअर पोर्ट रोड, येरवडा, पुणे येथे 'पूना क्लब लि'. च्या गोल्फ क्लबला १३४ एकर १९ गुंठे जमीन शासनाने वार्षिक रु. २६,८८५/- या सवलतीच्या दराने भाडेपट्टयाने दिली आहे.

सह. दुय्यम निबंधक (वर्ग-२) हवेली क्र. ११ यानी प्रमाणित केल्यानुसार वरील क्र. १ व २ चे एकूण बाजारमूल्य रक्कम रु. २,४८,७०,४८,५१२/- इतके आहे.

३) वरील जमिनीच्या वापराबाबत शासनाने घातलेल्या अटी करारात नमूद असून जिल्हाधिकारी, पुणे यांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम या जमिनीवर करता येणार नाही.

४) केंद्र व राज्य शासनाच्या वर्ग-१ राजपत्रित दर्जाच्या अधिकाऱ्यांना सेवाकालीन सभासदत्व देण्याबाबत करारपत्रात बंधनकारक तरतुदी आहेत.

५) सह दुय्यम निबंधक (वर्ग-२), हवेली क्र. ११ यानी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार संबंधित जागेची शासनाने निर्धारित केलेल्या दरात बाजारभावाप्रमाणे होणारी किंमत पुढीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. | बाजारमूल्य | | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| | | ४,००१ ते १०,००० चौ.मी. (७० टक्के) | १०,००० चौ.मी. पेक्षा जास्त (६० टक्के) | |
| १ | ३,६९,००० चौ.मी. | ५,८८,००,०००/- | १,८०,९३,६०,०००/- | १,८६,८१,६०,०००/- |
| २ | ५६,९४० चौ.मी. | १२,३२,२०,०००/- | ४९,५६,८८,५१२/- | ६१,८८,८८,५१२/- |

६) गोल्फ क्लबच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून रु. ४८ लाख एवढी रक्कम एकदाच देण्यात आली आहे.

वरील बाबी लक्षात घेता शासनाने सवलतीच्या भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीविना ‘पूना क्लब लि.,६, बंडगार्डन रोड, पुणे- १’ चे कार्य चालू शकत नाही. या जमिनीसाठी केलेली सवलतीची भाडे आकारणी व बाजारभावाप्रमाणे होणारे जमिनीचे मूल्य याचा विचार करता ‘पूना क्लब लि.,६, बंडगार्डन रोड, पुणे- १’ या संस्थेला अप्रत्यक्ष स्वरुपात शासनाचे भरीव अर्थसहाय्य असल्याचे स्पष्ट होते. केंद्र शासनाने एकाच वेळी दिलेले रु. ४८ लाख ही रक्कमही प्रत्यक्ष स्वरुपातील व नोंद घेण्याजोगी आहे. तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांच्या पूर्वपरवानगीशिवाय संबंधित भूखंडावर कोणतेही बांधकाम करता येणार नाही, प्राधिकृत सरकारी अधिकाऱ्यांना संबंधित भूखंडाची केव्हाही पाहणी करता येईल, केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांना विशिष्ट स्वरुपातील सभासदत्व देणे बंधनकारक आहे, इ. स्वरुपाचे शासकीय नियंत्रण करारान्वये क्लबवर आहे. या स्थितीत, ‘पूना क्लब लि.,६, बंडगार्डन रोड, पुणे- १’या संस्थेवर शासनाचे नित्य व सर्वंकष स्वरुपाचे नियंत्रण असल्याचे मानता येत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) (डी-i) त्याला लागू होणार नाही. मात्र शासनाचे प्रत्यक्ष

व अप्रत्यक्ष भरीव अर्थसहाय्य लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(एच)(डी-ii) त्याला लागू होते व म्हणून 'पूना क्लब लि.,६, बंडगार्डन रोड, पुणे- १' ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, अशा निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत असल्यामुळे तिला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. त्यामुळे संस्थेने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करणे व उक्त अधिनियमानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. 'पूना क्लब लि.,६, बंडगार्डन रोड, पुणे- १' या संस्थेला जमिनीच्या स्वरुपात मिळणारे अप्रत्यक्ष शासकीय अर्थसहाय्य लक्षात घेता, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (एच) (डी-ii) अन्वये ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते व म्हणून या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. परिणामी या अधिनियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे सदर संस्थेला बंधनकारक ठरते.

३. 'पूना क्लब लि., ६, बंडगार्डन रोड, पुणे-१' या संस्थेला उपरोक्त अ.क्र. २ प्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत असल्यामुळे अपीलकर्ता श्री. संतोष गोयल यानी मागितलेली माहिती त्याना देणे बंधनकारक ठरते. म्हणून श्री. संतोष गोयल यानी मूळ अर्जानुसार मागितलेली माहिती दि. २५/९/२०११ पर्यंत देऊन सचीव, पूना क्लब लि., पुणे यानी आयोगाला दि. ३०.९.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि :- ७.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती मीनल प्रभाकर रेगे
फ्लॅट नं. ६, तिसरा मजला,
आरंभ अपार्टमेंट, प्लॉट क्र. ११३५/४ क, अपीलकर्ता
फर्ग्युसन कॉलेज रोड, शिवाजीनगर, पुणे- ५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
विश्रामबाग विभाग, पुणे शहर, बुधवार पेठ,
दगडूशेठ गणपती मंदिरामागे, पुणे ४११ ००२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
विश्रामबाग विभाग, पुणे शहर, बुधवार पेठ,
दगडूशेठ गणपती मंदिरामागे, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्त्या -** श्रीमती मीनल प्रभाकर रेगे
फ्लॅट नं. ६, तिसरा मजला, आरंभ अपार्टमेंट, प्लॉट क्र. ११३५/४ क,
फर्ग्युसन कॉलेज रोड, शिवाजीनगर, पुणे- ५

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,

| | |
|---|---|
| | विश्रामबाग विभाग, पुणे शहर, बुधवार पेठ,<br>दगडूशेठ गणपती मंदिरामागे, पुणे श्री. भारतभूषण शर्मा |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पोलिस चौकीत नोंदविलेल्या तक्रारीबाबत पोलिस हवालदारांनी घेतलेल्या माझ्या जबाबाची प्रत मागितली होती. माझे दोन जबाब घेतले. दोन हवालदारांनी ते स्वतंत्रपणे लिहिले होते. पोलिसांनी त्यांच्या सोयीने लिहिलेल्या एका जबाबाची प्रत दिली व माझे म्हणणे असलेल्या दुस-या जबाबाची प्रत दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती मीनल रेगे यानी केली.

अपीलकर्त्यांच्या दि. १५/१/२०१० च्या अर्जाला दि. २७/१/२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले व जबाबाची प्रत दिली, तशी त्यांची पोहच आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, विश्रामबाग विभाग, पुणे शहर, बुधवार पेठ, पुणे श्री. भारतभूषण शर्मा यानी सांगितले.

श्रीमती रेगे यांची जबाबाची प्रत मिळाल्याची पोहच जन माहिती अधिकारी यानी सादर केली.

अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांमध्ये सार्वजनिक हिताचा कोणता विषय आहे, अशी विचारणा केली असता श्रीमती रेगे यानी 'सार्वजनिक हिताचा विषय नसून व्यक्तिगत स्वरुपाचा विषय' असल्याचे नमूद केले. श्रीमती रेगे रहात असलेल्या सोसायटीतील अन्य रहिवाशांच्या संदर्भात त्या व्यक्तिगत स्वरुपाच्या तक्रारी सातत्याने करीत असतात व त्यापाठोपाठ त्याबद्दलची माहिती मागणारे अर्जही करतात. दि. २३.८.२०११ पर्यंत असे ३८ अर्ज व अपिले त्यानी आमच्या कार्यालयाकडे केलेले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, विश्रामबाग विभाग, पुणे शहर, बुधवार पेठ, पुणे श्री. भारतभूषण शर्मा यानी सांगितले.

याबाबतचा तपशील सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री. भारतभूषण शर्मा यानी दि. २/९/२०११ च्या निवेदनाव्दारे असा तपशील सादर केला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्या श्रीमती मीनल रेगे यानी व्यक्तिगत स्वरुपाच्या विविध तक्रारी, निवेदने व पत्रव्यवहार केला असून त्या अनुषंगाने

माहिती-मागणीचे अर्ज व अपिले केली असल्याचे दिसते. तसेच पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील आक्षेपही त्यानी नोंदविलेले आहेत. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसेच व्यक्तिगत स्वरुपाच्या विषयासाठी सातत्याने अशा प्रकारचा पत्रव्यवहार/अर्ज/ अपिले व प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या तक्रारी आणि आक्षेप यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती याचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे

'Indiscriminate and impractical demands or directions under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter-productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged downwith the non-productive work of collecting and furnishing information', असे सर्वोच्च न्यायालयाने अपील क्र. ६४५४/२०११ प्रकरणी दि. ९/८/२०११ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे म्हटले आहे, याची जाणीव अपीलकर्त्यांस देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दैवान गोवर्धन जाधवर
वालवड, पो.चारे, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी,
तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७६ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर<br>प्रतिनिधी श्री.जी.एस.बेले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि.१२.११.२०१० रोजी या अपिलाच्या सुनावणीला उभय घटकांपैकी कोणीही उपस्थित नव्हते. यास्तव पुन्हा दि.३.९.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. परंतु या सुनावणीलाही अपीलकर्ता श्री.दैवान गोवर्धन जाधवर उपस्थित नव्हते.

‘जन माहिती अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरूध्द केलेल्या अपिलाचा निर्णय अपिलीय प्राधिकारी यानी देण्यापूर्वीच मी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. परंतु मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता नसल्याने अपील निकाली काढावे,’ असे अपीलकर्ता श्री.दैवान गोवर्धन जाधवर यांचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.जी.एस.बेले यानी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

प्रथम अपिलाच्या निर्णयापूर्वीच आयोगाकडे अपील करणे व दि.४.२.२०१० रोजी अपिलाचा निर्णय होऊन समाधान झालेले असताना त्यानंतरही आयोगाला त्याबाबत न कळविणे ही अपीलकर्त्याची कृती जबाबदारपणाची नाही व त्यांच्या भूमिकेबाबत साशंकता निर्माण करणारी आहे. याबाबत अपीलकर्ता श्री.दैवान गोवर्धन जाधवर याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि:- ६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

कु.हेमलता आप्पासाहेब उपासे द्वारा एम.एस.नकाते
मु.पो.ता.मंगळवेढा, खंडोबा गल्ली, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री.एस.जी.आंबेडकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि.७.४.२०११ रोजी या अपिलाच्या सुनावणीला उभय घटकांपैकी कोणीही उपस्थित नव्हते. यास्तव पुन्हा दि.३.९.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. परंतु या सुनावणीलाही अपीलकर्ता कु.हेमलता आप्पासाहेब उपासे या उपस्थित नव्हत्या.

'माझ्या मागणीनुसार शाळेतून माहिती मिळवून देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी केलेल्या प्रयत्नाबाबत मी समाधानी आहे. मला माहिती उशिरा मिळण्यास संस्था जबाबदार आहे. यापूर्वी मला मिळालेली माहिती हरविल्याने पुन्हा माहिती मागणी केली आहे,' असे अपीलकर्ता कु.हेमलता आप्पासाहेब उपासे यानी दिलेले दि.२५.५.२०११ चे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर यानी सुनावणीच्या वेळी सादर केले.

मिळालेली माहिती हरविल्यामुळे पुन्हा माहिती मागितली हे अपीलकर्ता कु.हेमलता आप्पासाहेब उपासे यांचे निवेदन जबाबदारपणाचे व कायद्याचे गांभीर्य राखणारे नाही, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.घननीळ नामदेव भोसले
कुमठा नाका, श्रीरामनगर प्लॉट नं.७, यशवंत हौसिंग सोसायटीलगत, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, सोलापूर ग्रामीण,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८९+२१०५ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.२०११ व दि.१८.३.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.घननीळ नामदेव भोसले<br>कुमठा नाका, श्रीरामनगर प्लॉट नं.७, यशवंत हौसिंग सोसायटीलगत, सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, सोलापूर ग्रामीण,<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर प्रतिनिधी श्री.डी.एन.यादव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : दि.५.४.२०१० रोजी लोकशाही दिनी केलेल्या अर्जाच्या चौकशीबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री.गुर्लिंग सोपान कांबळे यांच्या डायरीतील प्रवासविषयक नोंदी खोट्या आहेत. माहिती अपुरी व चुकीची दिली. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची सुनावणी घेतली नाही.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी : अपीलकर्ता यानी एकाच विषयाच्या अनुषंगाने चार अर्ज केले होते. प्रस्तुत अपिलातील दि.५.६.२०१० चा त्यांचा अर्ज आमच्याकडे आला नाही. दि.३.७.२०१० रोजी प्राप्त झालेल्या अर्जानुसार माहिती दिली. माहिती मागवून पडताळणी करून दिली आहे.

एकाच विषयाच्या संदर्भात अपीलकर्ता सातत्याने अर्ज व अपिले करीत असल्याचे दिसून येते. त्यात सार्वजनिक हिताचा भाग असल्याचे अपीलकर्ता स्पष्ट करू शकले नाहीत. तसेच चौकशीत पक्षपात झाल्याची व खोट्या नोंदी असल्याची अपीलकर्त्याची तक्रार असल्याचे त्यांच्या लेखी निवेदनावरूनही स्पष्ट होते. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीधर गणेश कुलकर्णी
मु.पो.बाभुळगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी,
तहसील कार्यालय बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी,
तहसील कार्यालय बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३ / २०११ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.३०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर
प्रतिनिधी श्री.जी.एस.बेले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

'मी दि.२१.४.२०११ व दि.१८.११.२०१० च्या पत्रानुसार, जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांच्याविरूध्द आपणांकडे तक्रार अर्ज दिलेला आहे. सदर तक्रारीचे निवारण,

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांच्यामार्फत झाल्याकारणाने माझी तक्रार निकाली काढण्यात यावी,'असे अपीलकर्ता श्री.श्रीधर गणेश कुलकर्णी यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.जी.एस.बेले यानी सुनावणीच्या वेळी सादर केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधीर जगदिशचंद्र काळे
औद्योगिक न्यायालय, सोलापूर, गणेश चेंबर्स, १६५, रेल्वेलाईन,
रंगभवनजवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय,
महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
चेतना कॉलेजजवळ, बांद्रा(पू),मुंबई-४०००५१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर,
गणेश चेंबर्स, १६५, रेल्वेलाईन, रंगभवनजवळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधीर जगदिशचंद्र काळे
औद्योगिक न्यायालय, सोलापूर, गणेश चेंबर्स, १६५,
रेल्वेलाईन, रंगभवनजवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, चेतना कॉलेजजवळ, बांद्रा(पू),मुंबई प्रतिनिधी श्री.ए.एस.जगदाळे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर, गणेश चेंबर्स, १६५, रेल्वेलाईन, रंगभवनजवळ, सोलापूर श्री.एस.जे.काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मूळ अर्जदार श्री.गौतम महादवे सुरवसे यानी माझा पगार, मूळ गावाकडील शेत मिळकत, घर मिळकत व त्यापासूनचे उत्पन्न आदी महिती मागितली होती. मीच जन माहिती अधिकारी असून मागितलेली माहिती वैयक्तिक असल्याच्या कारणावरून देता येत नसल्याचे कळविले. त्याविरुध्द त्यानी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, चेतना कॉलेजजवळ, बांद्रा(पू), मुंबई यानी माहिती देण्याचे आदेश दिले. मूळ अर्जदार त्रास देण्यासाठी अशा स्वरूपाचे अर्ज व माहितीची मागणी करीत असल्यामुळे माहिती नाकारण्याचा निर्णय योग्य ठरवावा व अपिलीय प्राधिकारी यांचे आदेश रद्दबातल करावेत.

अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी : मूळ अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती सार्वजनिक सेवकाबाबतची असल्यामुळे व्यक्तिगत सदरात नाही ती द्यावी, असा अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय आहे.

अपीलकर्ता सार्वजनिक सेवक असून त्यांच्या पगाराची माहिती ही बाब व्यक्तिगत ठरत नाही. तसेच जमीन अथवा घर ही मालमत्ता जाहीर करण्याच्या स्वरूपाची असल्यामुळे तिचे उतारेही देणे योग्य ठरते. या संदर्भात अपिलीय प्राधिकारी यानी दिलेला निर्णय योग्य आहे. मात्र या अनुषंगाने उत्पन्न, बँकेतील खात्याचे उतारे, गुंतवणूक अशी अन्य आर्थिक व वैयक्तिक स्वरूपाची माहिती देय ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तम दादाराव म्हस्के
यशवंत गृहप्रकल्प, बिल्डिंग नं.१, फ्लॅट नं.३, मु.पो.नातेपुते,
ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, माळशिरस उपविभाग,
अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय,
माळशिरस उपविभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८३ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११, दि.३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उत्तम दादाराव म्हस्के (दि.१०.५.२०११)
यशवंत गृहप्रकल्प, बिल्डिंग नं.१, फ्लॅट नं.३, मु.पो.नातेपुते,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, माळशिरस उपविभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.राजकुमार शंकर जुंदळे (दि.३.९.२०११)

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि.१०.५.२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्याने दि.३.९.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता अनुपस्थित होते.

दि.१०.५.२०११ च्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता श्री.उत्तम दादाराव म्हस्के यानी निवेदन दिले. श्री.यु.बी.देवकाते, श्री.बी.जी.गाडेकर, श्री.आर.सी.जगताप, श्री.पी.व्ही.गलांडे व श्री.पी.बी.पुद्दलवाड या पाच तलाठ्यांची माहिती मागितली होती. ती संकलित करून देणे आवश्यक होते. आमच्या एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असल्यामुळे माहिती मिळणे महत्त्वाचे होते. प्रशासकीय परिपत्रकांच्या प्रती कोठे प्राप्त होतील असे विचारले नव्हते, तर प्रती मागितल्या होत्या त्या देणे आवश्यक होते, असे त्यानी लेखी व तोंडी सांगितले.

अपीलकर्ता श्री.उत्तम दादाराव म्हस्के यानी पाच तलाठ्यांच्या सेवा काळातील माहिती, शासकीय परिपत्रकांच्या प्रती व 'माळशिरस उपविभाग निर्माण झाल्यापासून हस्तांतरण कार्यप्रणालीमध्ये प्राप्त झ ालेल्या सर्व संचिकांवर केलेली कार्यवाही,' अशी माहिती मागितली होती. संबंधित तलाठी तीन तालुक्यांमधील असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, माळशिरस उपविभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर यानी त्या त्या तालुक्याकडे अर्ज वर्ग करून अपीलकर्त्यास तसे कळविले. संबंधित जन माहिती अधिकाऱ्यानी त्याना माहिती दिली. शासकीय परिपत्रके शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे कळविले. अपीलकर्त्यास सर्व माहिती देण्यात आली असून त्यानी मुद्दा क्र.६ मध्ये सर्व संचिकांवरील कार्यवाहीबाबत विचारणा केलेली माहिती अतिव्याप्त स्वरूपाची आहे, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, माळशिरस उपविभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.अण्णासाहेब दादू चव्हाण यानी दि.१२.७.२०११ रोजी आयोगाला सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यानी ढोबळ मानाने, सरसकट स्वरूपात माहिती मागितली असून शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या शासकीय परिपत्रकांच्या प्रतींचीही मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

च्या कलम ७(९) प्रमाणे अशी माहिती नाकारता येईल. तसेच सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली परिपत्रकांसारखी माहिती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही, याची समज अपीलकर्ता श्री.उत्तम दादाराव म्हस्के याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अब्दुल अजीज गुलामनबी पटेल
१२, ग्रीनव्ह्यू अपार्टमेंट, आर.एस.नं.८७५, स्विमिंग टँकसमोर,
रमणमळा, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर,
सोन्या मारूती चौक, ९३५, सी वॉर्ड, जुने डीवायएसपी कार्यालय,
बुधवार पेठ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ,
तालुका शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३८ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर, सोन्या मारूती चौक, ९३५, सी वॉर्ड, जुने डीवायएसपी कार्यालय, बुधवार पेठ, कोल्हापूर श्री.एच.एस.मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, तालुका शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.शाह

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. अपरिहार्य कारणामुळे सुनावणी रद्द करण्यात आली व दि.१३.९.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जमीन एकत्रीकरण योजनेच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.अब्दुल अजीज गुलामनबी पटेल यानी मागितली होती. विहित मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, तालुका शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.आर.आर.देशमुख यानी त्याना उत्तर पाठविले. जन माहिती अधिकारी यांचे पत्र आपल्याला मिळाले नाही, असे अपीलकर्त्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितल्यामुळे त्या पत्राची प्रत त्याना दिली. त्यानंतर पुन्हा त्यानी केलेल्या मागणीनुसार माहितीही पाठविली. नक्कलशुल्क भरून हवी असलेली माहिती त्यानी प्राप्त करून घेणे आवश्यक होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, तालुका शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.शाह व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर, सोन्या मारूती चौक, ९३५, सी वॉर्ड, जुने डीवायएसपी कार्यालय, बुधवार पेठ, कोल्हापूर श्री.एच.एस.मोरे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भिमा ऊर्फ सुभाष परशराम शिंदे
मु.तळेवाडी, पो.अर्जुनवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, (सहकारी संस्था), गडहिंग्लज
कार्यालय, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, नागम्मादेवी विविध कार्यकारी सहकारी
(वि.का.स.) सेवा सोसायटी मर्यादित, तळेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५४ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भिमा ऊर्फ सुभाष परशराम शिंदे
मु.तळेवाडी, पो.अर्जुनवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, (सहकारी संस्था), गडहिंग्लज
कार्यालय, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर डॉ.अर्चना आटपलवार

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, नागम्मादेवी विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) सेवा
सोसायटी मर्यादित, तळेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.संजय नागोजी पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. अपरिहार्य कारणामुळे सुनावणी रद्द करण्यात आली व दि.१३.९.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

नागम्मादेवी विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) सेवा सोसायटी मर्यादित, तळेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर या संस्थेच्या संदर्भात मागितलेली माहिती अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर दि.१३.९.२०११ रोजी समक्ष मिळाली असल्यामुळे अपील निकाली काढावे, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.भिमा ऊर्फ सुभाष परशराम शिंदे यानी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

संस्थेला शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य मिळत नाही. तरीही अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर अपीलकर्ता यांच्या घरी जाऊन माहिती देऊ केली असता त्यानी ती घेतली नाही. रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली असता त्यानी ते टपाल स्वीकारले नाही, असे प्रतिपादन नागम्मादेवी विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) सेवा सोसायटी मर्यादित, तळेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर या संस्थेचे सचिव श्री.संजय नागोजी पाटील यानी केले. ते रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, (सहकारी संस्था), गडहिंग्लज कार्यालय, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर डॉ.अर्चना आटपलवार यानी नमूद केले.

नागम्मादेवी विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) सेवा सोसायटी मर्यादित, तळेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर या संस्थेला शासनाचे अर्थसहाय्य वा अनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तरीही माहिती देण्याबाबत संस्थेने दर्शविलेली तत्परता उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय कृष्णा कुंभार
ए-६, अनुपमा सहकारी गृहरचना संस्था बॉडीगेट
औंध, पुणे ४११ ००७ — तक्रारकर्ता

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | तक्रार क्रमांक | ६६/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/८/२०११ |

**३. उपस्थित**

**तक्रारकर्ता** श्री. विजय कृष्णा कुंभार
ए-६, अनुपमा सहकारी गृहरचना संस्था बॉडीगेट
औंध, पुणे ४११ ००७

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. आर.व्ही.ताकवले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

तक्रारकर्ता- दि. १/१/२००५ ते १६/५/२०११ या कालावधीत पुणे जिल्हयात परवाना दिलेल्या सर्व विशेष नागरी वसाहतींना (special township projects) दिलेल्या परवान्याच्या प्रती व या वसाहतींना नियमभंगाबाबत दिलेल्या नोटिशींच्या प्रती अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (४) नुसार जिल्हाधिकारी कार्यालय या 'सार्वजनिक प्राधिकरणा'ने ही सर्व माहिती नागरिकांसाठी लेखी स्वरुपात/संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणे आवश्यक असूनही तशी ती केलेली नाही, म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम (६) अन्वये माहिती मागितली. तीस दिवसांची मुदत संपण्याच्या शेवटच्या दिवशी संचिका अवलोकनासाठी येण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. अनेक विशेष नगर वसाहतींमधील भूखंडांबाबत इंटरनेटवर जाहिराती केल्या जात असून त्यातील नेमक्या कोणत्या विशेष नगर वसाहतींना शासनाने परवानगी दिली आहे, हे देश-विदेशातील नागरिकांना कळत नाही. मंजुरी नसताना व प्रकल्प कायदेशीर असल्याचा आभास निर्माण करुन भूखंड विक्री आदि व्यवहारांद्वारे लोकांची फसवणूक होते, अशा तक्रारी आहेत. सार्वजनिक महत्त्वाचा असा हा विषय आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने संकेत स्थळावर याबाबतची सर्व माहिती उपलब्ध ठेवल्यास अशा व्यवहारांना पायबंद बसू शकेल. परंतु तशी मागणी करुनही कार्यवाही का केली जात नाही, हे कळत नाही.

जन माहिती अधिकारी -जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारामध्ये विविध शाखा असून श्री.कुंभार यांनी खनिकर्म शाखा, जिल्हाधिकारी, पुणे या शाखेत अर्ज केला होता. माहिती त्या शाखेशी संबंधित नसल्यामुळे त्या शाखेने त्यांचा अर्ज महसूल शाखेकडे पाठविला. तो दि. ८/६/२०११ रोजी प्राप्त झाला. मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची होती.

१) मौजे मारुती व जांबे ता. मुळशी, जि. पुणे,

२) मौजे हडपसर ता. मुळशी, जि. पुणे,

३) मौजे नांदेड ता. मुळशी, जि. पुणे,

४) मौजे दत्तवाडी नेऱ्हे ता. मुळशी, जि. पुणे,

५) मौजे हिंजवडी ता. मुळशी, जि. पुणे,

६) मौजे भुगाव ता. मुळशी, जि. पुणे

या सहा विशेष नगर वसाहतींच्या संचिका आमच्या कार्यालयाकडे उपलब्ध असून प्रत्येक संचिकेत सुमारे २०० ते ५०० पृष्ठे आहेत. संचिका प्रत्यक्ष पाहून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती नोंदविल्यास उपलब्ध करुन देण्यात येतील, असे श्री. कुंभार याना कळविले व दि. ८/८/२०११ च्या पत्रान्वये २०३ पृष्ठांच्या प्रती त्याना उपलब्ध करुन दिल्या. या वसाहतींना नियमभंगाबाबतच्या नोटिसा दिलेल्या नसल्यामुळे त्याबाबतची माहिती निरंक आहे. नागरिकांना अशा स्वरुपाची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी व राज्य माहिती आयुक्त यांच्यातील चर्चेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखेमध्ये प्रत्येक आठवडयाच्या दर शुक्रवारी सर्व संचिका नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन ठेवण्यात आल्या आहेत. विशेष नगर वसाहतींच्या संदर्भातील सर्व माहिती येत्या ८ दिवसांत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

याच आशयाचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र ताकवले यानी दि. ३०/७/२०११ व दि. ११/८/२०११ च्या पत्रान्वये सादर केले.

सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील गाभाभूत तत्त्व आहे, आणि तक्रारकर्त्यांनी मांडलेला विषय सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. विशेष नगर वसाहतींबाबत देशातील व परदेशातील भारतीय नागरिकांना नेमकी व अधिकृत माहिती मिळाली नाही, तर जाहिराती केल्या जाणाऱ्या अशा वसाहतींच्या कायदेशीरपणाबाबतची वस्तुस्थिती त्यांना निःसंदिग्ध स्वरुपात कळणार नाही. यातून त्यांची फसवणूक होण्याची शक्यता असून हा विषय व्यापक सार्वजनिक हिताशी निगडित आहे, व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मध्ये तो अंतर्भूत होतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार ही सर्व माहिती शासनाने/ सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंस्फूर्तीने जाहीर करणे व या विषयासंदर्भात त्या त्या वेळी होणारी कार्यवाही, निर्णय यासह अनुषंगिक अशी माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे. संकेतस्थळावर ती उपलब्ध होणे आवश्यक आहे, परंतु तशी ती उपलब्ध नसल्यास कागदपत्रांच्या स्वरुपात कोणत्याही नागरिकाला केव्हाही ती मिळाली पाहिजे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ती कायमस्वरुपी उपलब्ध नाही. एवढेच नव्हे, तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (६) नुसार अर्ज करुन मागितल्यानंतरही ती तत्परतेने व परिपूर्ण स्वरुपात मिळत नाही, ही बाब गंभीर आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. ६४५४/२०११ प्रकरणी दि. ९/८/२०११ रोजी दिलेल्या निर्णयात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ चे महत्त्व ठळकपणे अधोरेखित केले आहे.

"The power under section 19 (8) of the Act in intended to be used by the commissions to ensure compliance with the Act, in particular ensure that every public authority maintains its records duly catalogued and indexed in the manner and in the form which facilitates the right to information and ensure that the records are computerized, as required under clause (a) of setion 4 (1) of the Act; and to ensure that the information enumerated in clauses (b) and (c) of sections 4(1) of the Act are Published and disseminated, and are periodically updated as provided in sub section (3) and (4) of section 4 of the Act. If the 'Infromation' enumerated in clause (b) of section 4 (1) of the Act are effectively disseminated (by publications in print and on websites and other effective means), apart from providing transparency and accountability, citizens will be able to access relevant information and avoid unnecessary application for information under the Act.

"The right to information is a cherished right. Information and right to information are intended to be formidable tools in the hands of responsible citizens to fight corruption and to bring the transparency and accountability. The provisions of RTI Act should be enforced strictly and all efforts should be made to bring to light the necessary information under clause (b) of section 4(1) of the Act which related to securing transparency and accountability in the working of public authorities and in discouraging corruption", असे सर्वोच्च न्यायालयाने या निकालात म्हटले आहे. त्याची जाणीव सर्व संबंधितांनी ठेवणे आवश्यक आहे.

वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मंजूर झाल्यापासून - दि. १२ ऑक्टोबर २००५- पासून - १२० दिवसांत या अधिनियमाच्या कलम ४ नुसार कार्यवाही करणे सर्व सार्वजनिक

प्राधिकरणांना बंधनकारक असल्याचे कायद्यातच नमूद आहे. तरीही ५ वर्षे उलटून गेल्यानंतरही त्याची पूर्तता न होणे हा नियमभंग ठरतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणी करणे ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय प्रमुखाची, म्हणजे प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, पुणे यांची जबाबदारी आहे. ही जबाबदारी लक्षात घेता नागरिकांना माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ नुसार ते जन माहिती अधिकारी ठरतात. माहिती उपलब्ध न झाल्यास/नाकारण्यास कारणीभूत ठरल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी कारवाईस पात्र ठरतात, याची जाणीव जिल्हाधिकारी, पुणे याना करुन देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यानी तसे जिल्हाधिकारी, पुणे याना अवगत करावे व सादर केलेल्या तशा टिप्पणीची प्रत आयोगाला सादर करावी. विशेष नगर वसाहतींच्या संदर्भातील सर्व माहिती ८ दिवसांत नागरिकांसाठी लेखी स्वरुपात/ संकेत स्थळावर उपलब्ध करुन द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार लिपिक श्री. गणेश कदम यानी जिल्हाधिकारी, पुणे याना दि. ६/८/२०११ रोजी सादर केलेल्या टिप्पणीची प्रत दि. ७/९/२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यानी आयोगाला सादर केली. मात्र या टिप्पणीत आयोगाच्या निदेशांचा स्पष्ट उल्लेख नाही. तथापि जिल्हाधिकारी, पुणे यानी 'लोकांच्या सुविधेसाठी शक्य तेवढी माहिती आवश्यकतेनुसार आपले वेबसाईटवर टाकणेबाबत मी यापूर्वीच कक्ष अधिकाऱ्यांच्या बैठकीत सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे सर्व शाखा प्रमखांना पुन्हा लेखी कळवावे', असा अभिप्राय नमूद केल्याचे प्रतीवरुन स्पष्ट होते. तसेच अशा सूचना देणाऱ्या, जिल्हाधिकारी, पुणे यानी दि. ८/९/२०११ रोजी प्रसृत केलेल्या परिपत्रकाची प्रत जन माहिती अधिकारी यानी आयोगास सादर केली. १) शाखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे २) सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ३) तहसीलदार हवेली व उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्याचे त्यात नमूद आहे.

विशेष नगर वसाहती (Township) बाबतचे आदेश http:www.pune.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केले असल्याचे जन माहिती अधिकारी यानी उपरोक्त पत्रात नमूद केले आहे. मात्र शासनाने मंजुरी दिलेल्या सर्व विशेष नगर वसाहतींच्या संदर्भातील संपूर्ण माहिती संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिली आहे की नाही, हे त्यात स्पष्ट नाही. काही शाखाधिकारी यानी अद्यापही माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ कलम (४) नुसार संकेत स्थळावर माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या दि. ८/९/२०११ च्या परिपत्रकातच नमूद केले आहे. हे लक्षात घेता विशेष नगर वसाहतींच्या संदर्भातील संपूर्ण माहिती संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिली आहे की नाही, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. 'सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रशासकीय प्रमुख' म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये उपलब्ध करावयाच्या माहितीची जबाबदारी जिल्हाधिकारी, पुणे यांची असून या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ अन्वये ते जन माहिती अधिकारी ठरतात. मात्र जिल्हाधिकारी, पुणे यानी समक्ष दिलेल्या सूचनांप्रमाणेच दि. ८/९/२०११ च्या परिपत्रकान्वये १) शाखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे २) सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, ३) तहसीलदार हवेली व उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहिती जाहीर करण्याबाबत लेखी सूचना पुन्हा दिल्या असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ५ (४,५) नुसार परिपत्रकात नमूद केलेले संबंधित कर्मचारी/अधिकारी जन माहिती अधिकारी ठरतात. त्यामुळे ही माहिती संकेत स्थळावर जाहीर केली गेली नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम २० नुसार शास्ती व अनुषंगिक कारवाईस ते पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. तक्रार मान्य करण्यात येत आहे.

२. पुणे जिल्हयातील मंजुरी दिलेल्या व मंजुरीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या विशेष नगर वसाहतींच्या (special township projects) संदर्भातील संपूर्ण माहिती जिल्हाधिकारी, पुणे यानी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम ४ नुसार संकेत स्थळावर दि.२६/९/२०११ पर्यंत उपलब्ध करुन द्यावी. तशी ती न दिल्यास अंमलबजावणी न करणारे संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्या जबाबदारीसह तपशीलवार अहवाल जिल्हाधिकारी, पुणे यानी संबंधितांच्या शास्तीबाबतच्या खुलाशासह दि. ३०/९/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. विशेष नगर वसाहतींच्या सारखेच सार्वजनिक महत्त्वाचे प्रस्ताव, त्याबाबतची मंजुरी, कार्यवाही, अनुषंगिक आदेश इ. सर्व बाबींची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ च्या कलम ४ अन्वये वेळोवेळी अद्ययावत करुन प्रसृत केली जाईल, याची दक्षता 'सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख' म्हणून जिल्हाधिकारी, पुणे यानी घ्यावी. संबंधितांना तशा लेखी सूचना निर्गमित करुन दि. ३०/९/२०११ पर्यंत त्याची प्रत आयोगाला सादर करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर राजाराम देशपांडे
मु.पो.चिमणे, ता.आजरा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
तहसील कार्यालय, कागल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल,
तहसील कार्यालय, कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधाकर राजाराम देशपांडे
मु.पो.चिमणे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल, तहसील कार्यालय, कागल, जि.कोल्हापूर
तत्कालीन डॉ.संपत कोंडाजी खिलारी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, तहसील कार्यालय, कागल,
जि.कोल्हापूर श्री.आण्णासाहेब आप्पाजी भाणसे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. अपरिहार्य कारणामुळे सुनावणी रद्द करण्यात आली व दि.१३.९.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : इनाम जमिनीच्या संदर्भात वारस नोंदी करून त्याची प्रत व त्या अनुषंगाने तहसीलदार, कागल यानी सादर केलेल्या अहवालानुसार दुरूस्ती करून माहिती दिली नाही. तशी माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांच्या दि.१९.४.२०१० च्या अर्जाला दि.१७.५.२०१०च्या पत्रान्वये उत्तर दिले. सन १९५० पासूनचा हा विषय असून उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती पुरविल्या.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांबरोबरच संपूर्ण अभिलेखात शोध घेऊन अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतीही पुरविल्या. त्या संदर्भातील त्यांच्या मूळ मागणीनुसार सर्व वस्तुस्थिती तपासून उपविभागीय अधिकारी, करवीर उपविभाग, कोल्हापूर याना दि.३०.३.२०१० रोजी अहवाल सादर केला. भूसपांदन मोबदला मिळणे, वारस नोंद होणे इ.बाबतच्या त्यांच्या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून त्याबाबतही नियमानुसार आवश्यक असलेल्या कार्यपध्दतीची माहिती समक्ष चर्चेने त्याना दिली आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांच्या अन्य मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्या येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकरराव लिंगोजी पाटील
प्लॉट नं.५, तोरणानगर, सागरमाळ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
कसबा बावडा मार्ग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा मार्ग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३१ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा मार्ग, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.आर.डी.रावळ

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा मार्ग, कोल्हापूर तत्कालीन श्री.शिवाजी जनार्दन शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. या तारखेला तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी सुनावणी रद्द करण्यात येऊन दि.१३.९.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पुनर्वसनासाठी संपादन केलेल्या आपल्या जादा क्षेत्रापोटी देण्यात येणार असलेली नुकसानभरपाई व त्या अनुषंगाने पारित केलेले आदेश याबाबतची माहिती विलंबाने, अपुरी, विसंगत व दिशाभूल करणारी मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शंकरराव लिंगोजी पाटील यानी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या निवेदनात केली आहे.

अपीलकर्ता यानी दि.१२.४.२०१० रोजी अर्ज सादर केला. तहसीलदार, पुनर्वसन हे पद गेल्या कित्येक वर्षांपासून रिक्त होते व आताही रिक्त आहे. मी दि.१४.७.२०१० रोजी पदभार स्वीकारला. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या २७ अवमान याचिका व ६९ रिट याचिका तेव्हा प्रलंबित होत्या. न्यायालयीन काम पाहण्याचे आदेश जिल्हाधिकारी, कोल्हापूर यानी मला दिले होते. कार्यालयातील सन १९७८ पासूनचे अभिलेख माहितीसाठी अवलोकन करणे आवश्यक होते. अपीलकर्त्याना समक्ष चर्चेत याबाबत कल्पना दिली. तसेच त्यानी विचारलेली माहिती संभाव्य कार्यवाहीची व अतिरिक्त संपादन झ ालेली जमीन परत मिळण्याची मागणी अशी होती. अभिलेखातील माहिती देण्याबरोबरच त्यांच्या मागणीवरील प्रशासकीय कार्यवाही मार्गी लावण्याचे कामही प्रयत्नपूर्वक केले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा मार्ग, कोल्हापूर श्री.शिवाजी शिंदे यानी केले. उच्च न्यायालयातील याचिकांबाबतच्या तपशिलासह पूरक कागदपत्रे त्यानी सादर केली.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. या संज्ञेत येणारी माहिती विलंबाने देण्यात आली असून त्याबाबतचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा मार्ग, कोल्हापूर श्री.शिवाजी जनार्दन शिंदे यांचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.विठ्ठल आनंदा पाटील (अपील क्र.१९८६ / २०१० / कोल्हापूर)
मु.पो.पाटपन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

(१)श्री.दत्तात्रय विश्वनाथ घाणेकर (अपील क्र.२१६३ / २०१० / कोल्हापूर)
कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित,
कोल्हापूर (गोकुळ), शिरगांव, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक,
सहकारी संस्था(दुग्ध), पुणे विभाग, पुणे, कॉमनवेल्थ इमारत,
लक्ष्मी पथ, पुणे-३० उत्तरवादी

**(१)जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित,
कोल्हापूर (गोकुळ), शिरगांव, जि.कोल्हापूर

**(२)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, निबंधक,
सहकारी संस्था(दुग्ध), कोल्हापूर जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी
यांचे कार्यालय, ताराबाई पार्क, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८६+२१६३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

| | |
|---|---|
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** (१)श्री.विठ्ठल आनंदा पाटील<br>मु.पो.पाटपन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक,<br>सहकारी संस्था(दुग्ध), पुणे विभाग, पुणे,<br>कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे श्रीमती सोनाली रावल-ठाकूर<br><br>**(१)जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा<br>सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर (गोकुळ),<br>शिरगांव, जि.कोल्हापूर<br>प्रतिनिधी श्री.रामकृष्ण बापूराव पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित असल्यामुळे दि.१३.९.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर (गोकुळ), शिरगांव, जि.कोल्हापूर या संस्थेकडे मागितलेली माहिती अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही संस्थेने दिली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर (गोकुळ), शिरगांव, जि.कोल्हापूर यानी कळविले. माहिती न दिल्याबद्दल दूध संघाच्या कार्यकारी संचालकांवर दंडात्मक कारवाई होऊन आर्थिक व मानसिक त्रासापोटी रूपये १,७७,००० नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विठ्ठल आनंदा पाटील यानी केली.(अ.क्र.१९८६)

दूध संघाला कोणतेही शासकीय भागभांडवल वा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष स्वरूपात अर्थसहाय्य मिळत नाही. National dairy development बोर्डाकडून (एनडीडीबी) कर्ज मिळते व त्याची परतफेड

केली जाते. त्यामुळे अधिनियमाच्या कलम २(एच)मधील तरतुदीनुसार दूध संघ 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरत नसून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा दूध संघाला लागू होत नाही. त्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिलेला निर्णय चुकीचा असून तो रद्द करावा, अशी मागणी दूध संघाचे कार्यकारी संचालक यांचे प्रतिनिधी श्री.रामकृष्ण बापूराव पाटील व ॲड.लुईस श्रीकांत शहा यानी केली.(अ.क्र.१६३) दूध संघाला उक्त अधिनियम लागू नसल्याचा निर्णय राज्य माहिती आयोगाने अपील क्र.१३२/२०१० / कोल्हापूर यामध्ये दिला असल्याचे त्यानी नमूद केले.

एनडीडीबी हा शासनाचा उपक्रम असून त्यानी दिलेले कर्ज हे अर्थसहाय्य मानून माहिती देण्याचे आदेश दिले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), पुणे विभाग, पुणे, कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे श्रीमती सोनाली रावल-ठाकूर यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर (गोकुळ), शिरगांव, जि.कोल्हापूर याना एनडीडीबीकडून मिळणारी रक्कम कर्ज स्वरूपाची असून तिची परतफेड केली जाते. अन्य कोणतेही अर्थसहाय्य वा अनुदान शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या दिले जात नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) मधील तरतुदीनुसार कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर (गोकुळ), शिरगांव, जि.कोल्हापूर ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. म्हणून अपील क्र.१९८६/ २०१० / कोल्हापूर मधील अपीलकर्ता श्री.विठ्ठल आनंदा पाटील यांची मागणी अमान्य करण्यात येत आहे. तसेच माहिती देण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), पुणे विभाग, पुणे, कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे श्रीमती सोनाली रावल-ठाकूर यानी दिलेले आदेश रद्दबातल ठरविण्यात येत आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपील क्र.१९८६/ २०१० / कोल्हापूर अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपील क्र.२१६३ / २०१० / कोल्हापूर मान्य करण्यात येत असून अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), पुणे विभाग, पुणे, कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे यांचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**